॥ पहिलीच भेट झाली ॥

गायकः अरुण दाते

पहिलीच भेट झाली, पण ओढ ही युगांची
जादू अशी घडे ही, या दोन लोचनांची ॥ धृ. ॥

पहिलीच भेट झालि, जडली अपूर्व बाधा
स्वप्नात गुंग झाले, जागे पणात राधा।
माझी न राहिले मी, किमया हि कुणा ऽची
जादू अशी घडे ही, या दोन लोचनांची ॥ १ ॥

डोळे मिटून घेता, दिसतेस तू समोर
फुलवून पंख स्वप्नी, अन नाचतात मोर।
झाली फुले सुगंधी, माझ्या हि भावनांची
जादू अशी घडे ही, या दोन लोचनांची ॥ २ ॥

लाजून वाजति या अंगतुनि सतारे,
ऐश्वर्य घेउनि हे, ये दैव आज दारी।
मी लागले बघाया, स्वप्ने ही मीलनची,
जादू अशी घडे ही, या दोन लोचनांची ॥ ३ ॥

वार्यात ऐकतो मी, आता तुझीच गाणी
पाण्यात वाचतो मी, या प्रितिची कहाणी।
पहिलीच भेट झालि, पण ओढ ही युगांची
जादू अशी घडे ही, या दोन लोचनांची ॥ ४ ॥